संघर्षातून नेतृत्वाकडे...

**बदल तुमच्यातच आहे!**

बेरोजगारी ते नेतृत्व

हा प्रवास तुमचाच!

# बेरोजगारीतून घडवा नेतृत्व




संघर्ष, अपयश आणि बेरोजगारीला नेतृत्वात बदलण्याचे रहस्य

लेखक:

**श्री राज धनवे**



# बेरोजगारीतून घडवा नेतृत्व

संघर्ष, अपयश आणि बेरोजगारीला
नेतृत्वात बदलण्याचे रहस्य



लेखक:

**श्री राज धनवे**

# बेरोजगारीतून घडवा नेतृत्व

"संघर्ष, अपयश आणि बेरोजगारीला नेतृत्वात बदलण्याचे रहस्य"

**लेखक :** श्री राज धनवे

**भाषा :** मराठी

**प्रकार :** ई-पुस्तक

**प्रथम आवृत्ती :** जून २०२६

**ISBN :** 978-93-5967-184-0

**प्रकाशक :** आर. आर. धनवे प्रकाशन (Raju Ruprao Dhanve)

**पत्ता :** मु. वळती, पोस्ट हातनी, ता. चिखली, जि. बुलढाणा

महाराष्ट्र – ४४३२०१

**संपर्क मो. :** ८३७८९०८२७१

**E-mail :** raj8dhanve@gmail.com

**विशेष सहकार्य :** श्री तेजराव जगताप सर

**मार्गदर्शक :** श्री प्रवीण लहाने सर

**मुखपृष्ठ रचना :** श्री राज धनवे

**अंतर्गत मांडणी :** श्री राज धनवे

**डिझाईन :** श्री राज धनवे

**मूल्य :** ₹ २९९/-

---

**सर्वाधिकार सुरक्षित**

Copyright © 2026 Raj Dhanve

या पुस्तकातील कोणताही भाग लेखकाच्या पूर्वलिखित परवानगीशिवाय कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रित, प्रतिलिपित, संग्रहित अथवा प्रसारित करता येणार नाही. या पुस्तकातील मजकूर, संकल्पना, रचना, मांडणी, डिझाईन तसेच प्रकाशन, वितरण आणि पुनरुत्पादन यांवरील सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.

अपयशाने ज्यांना
थांबवलं नाही...

बेरोजगारीने ज्यांची
स्वप्नं मारली नाहीत...

संघर्षाने ज्यांना
अधिक मजबूत बनवलं...

आणि परिस्थितीला दोष देण्याऐवजी
ती बदलण्याचा निर्धार ज्यांनी केला...

आणि स्वतःचं आयुष्य बदलतांना
समाजही बदलण्याचं स्वप्न
पाहणाऱ्या...

अशा प्रत्येक

# भावी नेत्याला...

हे पुस्तक समर्पित...



## मनोगत

**नमस्कार,**

माझं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर इतर लाखो तरुणांप्रमाणे मीही सरकारी नोकरीचं स्वप्न पाहिलं. त्यासाठी तीन ते चार वर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी केली. अभ्यास केला, प्रयत्न केले, अनेक परीक्षा दिल्या. पण अपेक्षित यश मिळालं नाही. त्यात मीच कमी पडलो असेल कदाचित. पण माझ्यासारख्या त्या हजारो तरुणांचं काय? जे पात्र होते, मेहनती होते, अभ्यासू होते; पण ज्यांच्या संधी भरती प्रक्रियेमधील पेपरफुटी, भ्रष्टाचार, न्यायालयीन प्रकरणं आणि अनिश्चिततेमुळे हिरावल्या गेल्या? आज असे अनेक तरुण बेरोजगार आहेत. कुठेतरी ते या भ्रष्ट व्यवस्थेचे बळी ठरले आहेत.

या सर्व अपयश, सरकारी भरतीमधील अनिश्चितता, भ्रष्टाचार, संघर्ष, बेरोजगारी आणि समाजाच्या मानसिकतेचा मी जवळून अनुभव घेतला.

सरकारी नोकरी न मिळाल्यानंतर अनेक तरुणांसमोर जसा प्रश्न उभा राहतो, तसाच प्रश्न माझ्यासमोरही उभा राहिला... आता पुढे काय?

कारण जसजसं वय वाढत जातं तसतशा घरच्यांच्या अपेक्षाही वाढत जातात. चांगली नोकरी, वेळेत लग्न, स्थिर आयुष्य आणि समाजात स्वतःची ओळख निर्माण करण्याचा दबाव नकळत वाढत जातो.

त्यानंतर मी खाजगी क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. बँक आणि फायनान्स क्षेत्रात कॅश, ऑडिट, विक्री, कर्ज, अकाउंटिंग यापासून ते शाखा व्यवस्थापक पदापर्यंत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. या प्रवासात कमी पगार, लक्ष्य पूर्ण करण्यासाठीचा दबाव, रात्री उशिरापर्यंत काम, सुट्टीच्या दिवशीही काम, वारंवार होणारे स्थलांतर, नोकरीतील असुरक्षितता आणि भविष्याबद्दलची चिंता या सगळ्यांचा अनुभव घेतला.

सरकारी नोकरीत आलेलं अपयश आणि खाजगी नोकरीतील वास्तव या दोन्ही गोष्टींनी मला एक महत्त्वाची गोष्ट शिकवली... फक्त शिक्षण घेतलं म्हणून आयुष्य बदलत नाही. योग्य दिशा, योग्य संधी आणि योग्य व्यवस्था मिळणंही तितकंच महत्त्वाचं असतं.

पण स्वतःमधील क्षमता ओळखून काहीतरी वेगळं करण्याचे प्रयत्न चालूच होते. याच काळात लेखन आणि ब्लॉगिंगची आवड निर्माण झाली. सुरुवातीला छंद म्हणून सुरू झालेली ही गोष्ट पुढे माझ्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनली. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनेक ब्लॉग आणि संकेतस्थळांवर काम केलं. हजारो लेख लिहिले. या प्रवासाने मला माहिती शोधणं, अभ्यास करणं, प्रश्न विचारणं आणि लोकांपर्यंत विचार पोहोचवणं शिकवलं.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज आपल्या हातात माहितीची ताकद आहे. एका बटनावर जगभरातील माहिती उपलब्ध होते. त्यामुळे आपण ठरवलं तर संधींची कमतरता नसते. गरज असते ती फक्त योग्य दिशेने केलेल्या प्रयत्नांची.

**पण हे पुस्तक लिहण्याची खरी प्रेरणा मला माझ्या गावातील वास्तवातून मिळाली.**

सरकार लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी निधी देण्यात कुठेच कमी पडत नाही. पण अनेक ठिकाणी तो निधी ज्या लोकांसाठी असतो त्यांच्यापर्यंत पूर्णपणे पोहोचत नाही. त्यामुळे सामान्य माणसाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. एखादं साधं काम करून घेण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. काही ठिकाणी अनावश्यक अडथळे निर्माण केले जातात. विकासाच्या नावाखाली निधी खर्च झाल्याचं दाखवलं जातं, पण प्रत्यक्षात काम दिसत नाही. हे सगळं मी स्वतः पाहिलं आणि अनुभवलं.

याच गोष्टींचा अभ्यास करताना मी माहिती अधिकार आणि विविध शासकीय संकेतस्थळांच्या माध्यमातून माहिती गोळा करायला सुरुवात केली. यामुळे गावातील भ्रष्टाचाराचे खरे रूप मला समजले. या बाबतीत पुरावे

गोळा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चौकशी साठी अर्ज केले. पण ही व्यवस्था भ्रष्ट करण्यामध्ये संपूर्ण साखळी कामाला लागलेली असते याचाही प्रत्यय आला. या प्रवासात दबाव, बदनामी, विरोध आणि अनेक प्रकारच्या अडचणींचाही सामना करावा लागला. तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली...

"सत्य बाहेर आणण्यासाठी अनेकदा मोजकीच माणसं लढत असतात. पण ते सत्य बाहेर येऊ नये यासाठी त्यांच्या विरोधात अनेक शक्ती काम करत असतात."

या भ्रष्ट व्यवस्थेमुळे अपात्र लोक पैसे भरून नोकऱ्या मिळवतात, निवडणूक जिंकतात. पुढे तेच लोक पुन्हा भ्रष्टाचाराच्या चक्राला खतपाणी घालतात. पण या सगळ्यात बळी ठरतो तो एक प्रामाणिक तरुण. ज्याने रात्रंदिवस मेहनत करून अभ्यास केला, कष्ट घेतले, स्वप्न पाहिली, पण त्याला संधी मिळाली नाही.

त्याने शेती करून पाहिली, पण शेतीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन त्याच्या आयुष्यात अडथळा ठरला. त्याने व्यवसाय करून पाहिला, पण मोठ्या स्पर्धेत टिकणं त्याला शक्य झालं नाही. आणि आज तोच अभ्यासू, सक्षम आणि मेहनती तरुण बेरोजगार म्हणून जगत आहे.

**तरीही मला वाटतं की व्यवस्था बदलू शकते. आणि ती बदललीच पाहिजे.**

या सगळ्या अनुभवांमधून माझ्या लक्षात आलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे... गावागावात अनेक तरुण चांगलं शिक्षण घेऊनही बेरोजगार आहेत. बरेच जण प्रयत्न करून करून थकले आहेत. वय वाढत आहे, जबाबदाऱ्या वाढत आहेत, पण संधी मिळत नाहीत. काही जण नैराश्याच्या गर्तेत गेले आहेत. काहींनी स्वप्नं पाहणं सोडून दिलं आहे. काही जण केवळ पोट भरण्यासाठी मिळेल ते काम करत आहेत.

पण दुसऱ्या बाजूला स्थानिक राजकारणात अभ्यासू, प्रामाणिक आणि समाजासाठी काम करणाऱ्या तरुणांची कमतरता स्पष्टपणे जाणवते. एकीकडे तरुणांकडे ऊर्जा आहे, दुसरीकडे समाजाला नेतृत्वाची गरज आहे, तेव्हाच माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झाले...

जर निर्णय राजकारणातून घेतले जात असतील, जर गावाचा विकास राजकारणातून ठरत असेल, जर निधी कुठे खर्च होणार हे राजकारणातून ठरत असेल, तर या प्रक्रियेत प्रामाणिक आणि अभ्यासू तरुणांनी सहभागी का होऊ नये? आणि ज्याच्या आयुष्यात हरण्यासारखं काहीच उरलेलं नाही, ज्याला स्वतःचं भविष्य अंधारात दिसत आहे, अशा तरुणाने नेतृत्वाचा मार्ग का निवडू नये?

**याच प्रश्नातून "बेरोजगारीतून घडवा नेतृत्व" या पुस्तकाचा जन्म झाला.**

हे पुस्तक कोणत्याही पक्षाचं किंवा विशिष्ट विचारधारेचं समर्थन करत नाही. हे पुस्तक एका सामान्य युवकाच्या प्रवासाबद्दल आहे. स्वतःला अपयशी समजणाऱ्या, दिशाहीन झालेल्या आणि आयुष्यात हरल्याची भावना मनात घेऊन जगणाऱ्या तरुणांच्या अपयशापासून जागृतीपर्यंत, जागृतीपासून नेतृत्वापर्यंत आणि नेतृत्वापासून समाजपरिवर्तनापर्यंतच्या प्रवासाबद्दल आहे.

माझा उद्देश कोणालाही नेता घोषित करणं नाही. पण प्रत्येक तरुणामध्ये नेतृत्वाची क्षमता आहे याची जाणीव करून देणं हा नक्कीच आहे.

जर या पुस्तकामुळे एखादा तरुण स्वतःकडे नव्या नजरेने पाहू लागला, जर अपयशाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलला, जर त्याला व्यवस्थेमध्ये प्रवेश करून बदल घडवण्याची प्रेरणा मिळाली, तर या पुस्तकाचा उद्देश सफल झाला असं मी मानेन.

**आपलाच,**
**राज धनवे**

## हे पुस्तक का लिहिलं?

राजकारणात कोणतेही ठराविक नियम नसतात. प्रत्येक ठिकाणी परिस्थिती वेगळी असते, प्रत्येक गाव वेगळं असतं आणि प्रत्येक मतदार वेगळा विचार करतो. इथे वेळ आणि परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे या पुस्तकामध्ये तुम्हाला राजकारण शिकवण्याचा प्रयत्न केलेला नाही. कारण राजकारण पुस्तकातून शिकता येत नाही. ते लोकांमध्ये राहून, संघर्षातून, चुका करून आणि परिस्थिती समजून घेत शिकावं लागतं. या पुस्तकातून मी फक्त एक मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकामागे एक प्रश्न आहे, एक वेदना आहे आणि एक शक्यता आहे. जर आज तुमच्याकडे हरवण्यासारखं काहीच शिल्लक नसेल, जर तुमच्या आजच्या अवस्थेला कुठेतरी ही भ्रष्ट व्यवस्था जबाबदार वाटत असेल, जर तुम्ही प्रयत्न करून करून थकला असाल, तर राजकारणात तुम्ही का येऊ नये?

गेल्या काही वर्षांमध्ये मी बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, सरकारी भरतीमधील अनिश्चितता, खाजगी नोकरीतील वास्तव आणि गावपातळीवरील भ्रष्ट व्यवस्था जवळून पाहिली आहे. या प्रवासात एक गोष्ट सतत जाणवत राहिली. आपल्या समाजात लाखो तरुण मेहनत करत आहेत, अभ्यास करत आहेत, संघर्ष करत आहेत; पण त्यांना योग्य दिशा मिळत नाही. दुसऱ्या बाजूला समाजातील अनेक समस्या वर्षानुवर्षे तशाच राहतात, गावांचा विकास अडकतो, निधीचा गैरवापर होतो आणि सामान्य माणसाला त्याच्या हक्कासाठीही संघर्ष करावा लागतो.

यामागचं मूळ कारण शोधायला गेलो तेव्हा एक गोष्ट स्पष्ट झाली. बहुतेक निर्णय राजकारणातून घेतले जातात. मग ते शिक्षणाचे असोत, रोजगाराचे असोत, शेतीचे असोत किंवा स्थानिक विकासाचे असोत. मग माझ्या मनात अजून एक प्रश्न निर्माण झाला. जर अभ्यासू, प्रामाणिक आणि संघर्षातून घडलेले तरुण राजकारणात आले तर? जर बेरोजगारीत अडकलेली ऊर्जा नेतृत्वात बदलली तर?

याच विचारातून **"बेरोजगारीतून घडवा नेतृत्व"** या पुस्तकाचा जन्म झाला.

## हे पुस्तक कोणासाठी आहे?

हे पुस्तक विशेषतः अशा तरुणांसाठी आहे जे आज स्वतःच्या भविष्याबद्दल संभ्रमात आहेत. जे स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत किंवा त्यामध्ये अपयशाचा सामना करत आहेत. जे बेरोजगारीशी झुंज देत आहेत. जे खाजगी नोकरीतील संघर्ष अनुभवत आहेत. जे समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि स्थानिक समस्यांकडे फक्त प्रेक्षक म्हणून न पाहता काहीतरी बदल घडवण्याची इच्छा बाळगतात. किंवा ज्यांच्याकडे आता हरवण्यासाठी काहीच शिल्लक राहिलेलं नाही.

हे पुस्तक सामाजिक कार्य करणाऱ्या तरुणांसाठी आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका किंवा इतर निवडणुकांमध्ये सहभागी होण्याचा विचार करणाऱ्यांसाठी आहे. राजकारण समजून घ्यायचं आहे, पण सुरुवात कुठून करावी हे माहीत नसलेल्या लोकांसाठी आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे पुस्तक त्या प्रत्येक सामान्य तरुणासाठी आहे जो स्वतःला आज अपयशी समजतो, पण ज्याच्यामध्ये उद्याचा नेता होण्याची क्षमता आहे.

## हे पुस्तक कसं वाचावं?

हे पुस्तक अपयशी आणि बेरोजगार तरुणांना राजकारणाचा मार्ग दाखवणारे आणि त्यांना त्यासाठी मार्गदर्शन करणारे आहे. हा एका सामान्य तरुणाच्या परिवर्तनाचा प्रवास आहे. म्हणून हे पुस्तक शक्यतो सुरुवातीपासून शेवटपर्यंत क्रमाने वाचा. या पुस्तकातील प्रत्येक भाग पुढच्या भागाशी जोडलेला आहे.

या प्रवासामध्ये आपण वास्तवापासून सुरुवात करू. त्यानंतर जागृती, व्यवस्था समजून घेणे, नेतृत्वाची पायाभरणी, समाजातील प्रभाव, राजकारणात प्रवेश, चळवळ, राजकीय ओळख, निवडणूक, सत्ता, संघर्ष आणि दीर्घकालीन नेतृत्व या टप्प्यांतून पुढे जाऊ.

हे पुस्तक वाचताना फक्त माहिती म्हणून वाचू नका. प्रत्येक ठिकाणी स्वतःला त्या परिस्थितीत ठेवून विचार करा. स्वतःला प्रश्न विचारा. आणि या संपूर्ण प्रवासात तुमची जागा नेमकी कुठे आहे? हे शोधण्याचा प्रयत्न करा.

## वाचकांसाठी एक महत्त्वाची सूचना

हे पुस्तक वाचल्यानंतर लगेच राजकारणात उतरण्याचा निर्णय घेऊ नका. कारण राजकारण हा केवळ निवडणुकीचा विषय नाही. तो जबाबदारीचा विषय आहे. तो लोकांच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयांचा विषय आहे.

- म्हणून आधी स्वतःला समजून घ्या.
- तुमची क्षमता समजून घ्या.
- समाज समजून घ्या.
- व्यवस्था समजून घ्या.

या पुस्तकाचा उद्देश कोणालाही राजकारणात ढकलण्याचा नाही. तर राजकारण, नेतृत्व आणि व्यवस्था यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा आहे.

जर या पुस्तकामुळे तुम्ही स्वतःच्या आयुष्याकडे आणि समाजाकडे नव्या नजरेने पाहू लागलात, जर तुम्हाला तुमच्या संघर्षामध्ये एक नवीन दिशा दिसू लागली आणि जर तुम्हाला असं वाटू लागलं की परिस्थिती बदलण्याची ताकद तुमच्यामध्येही आहे, तर या पुस्तकाचा उद्देश पूर्ण झाला असं मी मानेन.

---

## अनुक्रमणिका


**भाग १. वास्तव आणि जागृती** **1**

**प्रकरण १. आजचा तरुण आणि वास्तव** **3**

१.१ तरुणांचे अपयश आणि अवस्था 3

१.२ शिक्षण पद्धत vs वास्तविकता 4

१.३ बेरोजगारीची खरी वेदना 5

१.४ सरकारी भरतीतील अनिश्चितता 6

१.५ समाज आणि कुटुंबाची मानसिकता 7

१.६ अपयशाचा खरा अर्थ 8

१.७ अपयशातून संधी 8

१.८ वैयक्तिक संघर्ष ते सामाजिक जाणीव 9

१.९ “मीच का?” पासून “मीच करू शकतो” 9

**प्रकरण २. सत्ता, संधी आणि व्यवस्थेचा खरा खेळ** **11**

२.१ राजकारणच का निवडायचं? 12

२.२ राजकारण आणि गैरसमज 13

२.३ सामान्य माणूस आणि सत्ता 15

२.४ सत्तेची खरी ताकद 16

२.५ स्थानिक समस्या आणि राजकारण 17

२.६ घराणेशाही आणि पैशाच्या राजकारणाचा प्रभाव 18

२.७ युवक का मागे पडतो? 18

२.८ राजकारण कोणासाठी आहे? 19

२.९ राजकारणातील संधी 20

२.१० राजकारणात कधी येऊ नये? 21

२.११ लोकांना पर्याय हवा आहे 21

२.१२ अंतिम निर्णय 22

**भाग २. राजकारण आणि सत्तारचना समजून घेणे** **24**

**प्रकरण ३. राजकारण सोप्या भाषेत** **26**

३.१ राजकारण म्हणजे काय? 26

३.२ समाज, अर्थव्यवस्था आणि सत्ता यांचा संबंध 27

३.३ निर्णय प्रक्रिया आणि शासन 28
३.४ सरकार आणि लोकांचे गैरसमज 28
३.५ राजकारण vs प्रशासन 29
३.६ स्थानिक स्तरावर राजकारण कसं चालतं? 29
३.७ व्यवस्था (System) समजली नाही तर? 30
३.८ व्यवस्था (System) समजली तर? 30
३.९ व्यवस्था (System) आणि तुम्ही 31

**प्रकरण ४. सत्तारचना समजून घ्या 32**
४.१ संविधानाची मूलभूत तत्त्वे 32
४.२ लोकशाहीतील नागरिकांची खरी शक्ती 33
४.३ केंद्र, राज्य आणि स्थानिक सत्ता – सत्तेचे तीन स्तर 33
४.४ घटनात्मक प्रमुख – राष्ट्रपती आणि राज्यपाल 34
४.५ संसद, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था 35
४.६ पंतप्रधान ते सरपंच – नेतृत्वाची संपूर्ण साखळी 35
४.७ प्रशासकीय रचना 36
४.८ निवडणूक आयोग – लोकशाहीचा कणा 36
४.९ न्यायालय आणि त्याची भूमिका 37
४.१० लोकशाहीचा चौथा स्तंभ 38
४.११ राजकीय पक्षांची भूमिका 38
४.१२ अपक्ष उमेदवार 39
४.१३ निर्णय प्रक्रिया – फाईल कशी फिरते? 40
४.१४ पैसा, मंजुरी आणि अंमलबजावणी 41
४.१५ पडद्यामागचा खेळ 41
४.१६ सामान्य माणूस System मध्ये का हरतो? 42
४.१७ System समजणं म्हणजे अर्धी लढाई जिंकणं 43

**भाग ३. नेतृत्वाची पायाभरणी 44**

**प्रकरण ५. राजकारण तुमच्यासाठी योग्य आहे का? 46**
५.१ Self-Test: तुमच्यात नेत्याचे गुण आहेत का? 46
५.२ तुम्ही Follower आहात की Leader? 47
५.३ राजकारणासाठी आवश्यक मूलभूत कौशल्ये 48
५.४ “लोक काय म्हणतील?” सर्वात मोठा अडथळा 49
५.५ Ego vs नेतृत्व 50

५.६ अपयश, नकार आणि विरोध 50
५.७ तुमचं “Why” Clear आहे का? 51
५.८ तुम्ही तयार आहात का? 52

**प्रकरण ६. नेत्याचा मेंदू कसा तयार होतो? 53**
६.१ नेता जन्माला येत नाही – तयार होतो 53
६.२ जुन्या विचारांची चौकट तोडणं 54
६.३ प्रतिक्रिया नव्हे, प्रतिसाद देण्याची सवय 55
६.४ स्वतःवर नियंत्रण = नेतृत्व 56
६.५ दबावाखाली शांत राहणं 56
६.६ विश्वासार्हता, संयम आणि वेळेची समज विकसित करणं 57
६.७ निरीक्षण आणि पॅटर्न ओळखणं 58
६.८ निर्णय घेण्याची सवय तयार करणं 58

**भाग ४. समाजात ओळख आणि प्रभाव 59**

**प्रकरण ७. नेटवर्क, प्रभाव आणि नियंत्रण 61**
७.१ राजकारण आणि नेटवर्क 61
७.२ प्रभाव म्हणजे नेमकं काय? 62
७.३ स्थानिक स्तरावर प्रभाव कसा तयार करायचा 63
७.४ कार्यकर्ते तयार करणं – तुमची खरी ताकद 63
७.५ अधिकारी, पत्रकार आणि स्थानिक प्रभावशाली लोकांशी संबंध 64
७.६ काम करून घेण्याची कला 65
७.७ Social Media चा रणनीतिक वापर 65
७.८ तुमचं नाव म्हणजे काम 66
७.९ मार्गदर्शक (Godfather) ची भूमिका 67
७.१० गट आणि समीकरणे मॅनेज करणं 67
७.११ नेटवर्कचा विस्तार करणे – एका वॉर्डपासून पुढे 68
७.१२ नेटवर्क वाढवतांना या चुका टाळा 69
७.१३ प्रभाव मिळाल्यावर जबाबदारी वाढते 70

**प्रकरण ८. लोकांच्या समस्या ओळखणे आणि सोडवणे 71**
८.१ नेता म्हणजे “Problem Solver” 71
८.२ समस्या ओळखण्याची कला 72
८.३ सर्व्हे, मीटिंग आणि ग्रामसभा 73

८.४  समस्या नोंदवणं आणि यंत्रणा तयार करणे 73
८.५  "काम अडतं कुठे?" – मूळ कारण समजून घेणं 74
८.६  लोकांना न्याय आणि हक्क मिळवून देणं 74
८.७  प्रत्येक कामातून शिकणं 75
८.८  लोक तुमच्याकडे येतात का? 75

**प्रकरण ९. लोकांमध्ये पकड कशी तयार करावी? 77**

९.१  छोट्या समस्यांपासून सुरुवात 77
९.२  लोकांचा विश्वास जिंकण्याची कला 78
९.३  मतदारांचा विश्वास जिंकण्यासाठी ५ मानसशास्त्रीय सूत्रे 78
९.४  "आपला माणूस" अशी Image तयार करणं 79
९.५  समाजातील वेगवेगळ्या गटांमध्ये प्रवेश 80
९.६  गावातील/वॉर्डमधील सत्ताकेंद्रे ओळखणं 80
९.७  प्रभावशाली लोकांशी Smart व्यवहार 81
९.८  लोकांच्या भावना आणि Ego समजून घेणं 81
९.९  कामाचं Narrative तयार करणं 82
९.१०  "तुमच्याशिवाय काम होत नाही" ही स्थिती तयार करणं 82
९.११  चुका टाळा – पकड कमकुवत करणारे Factors 82
९.१२  आजची पकड = उद्याची सत्ता 83

**भाग ५. राजकारणात प्रवेश 84**

**प्रकरण १०. पहिली पाऊले आणि ओळख निर्माण करणे 86**

१०.१  राजकारणात प्रवेश कसा करावा? 86
१०.२  सामाजिक कामातून प्रवेश 87
१०.३  युवक संघटना आणि विद्यार्थी नेतृत्व 88
१०.४  लोकांशी बोलण्याची सवय तयार करा 89
१०.५  पहिलं काम – छोटं पण प्रभावी 89
१०.६  घरभेट आणि जनसंपर्क 90
१०.७  "काम होतं" ही ओळख कशी तयार होते? 91
१०.८  सुरुवातीचे ५ Traps 91
१०.९  ओळख निर्माण झाली की खेळ बदलतो 92

**प्रकरण ११. पैसा नसतांना राजकारण कसे सुरू करावे? 93**

११.१  राजकारणासाठी पैसा खरंच आवश्यक आहे का? 94

११.२ तुमची प्रतिमाच तुमचे सुरुवातीचे भांडवल 94
११.३ Self-work नव्हे, System-work 95
११.४ Micro-fundraising तंत्र 95
११.५ समर्थकांकडून योगदान 96
११.६ कार्यक्रम आणि उपक्रमांसाठी निधी 97
११.७ पारदर्शक निधी व्यवस्थापन 98
११.८ मार्केटिंग शिवाय राजकारण नाही 98
११.९ तुमच्याकडे फोन येतो का? 99
११.१० झिरो बजेट राजकारण – पैसा नाही पण व्यवस्था आहे 100

**भाग ६. चळवळ आणि नेतृत्व 101**

**प्रकरण १२. भ्रष्टाचाराविरुद्ध लढा 103**
१२.१ भ्रष्टाचार म्हणजे नेमकं काय? 103
१२.२ भ्रष्टाचाराचा पॅटर्न कसा ओळखायचा? 104
१२.३ "सगळेच करतात" – हा सगळ्यात मोठा Trap 106
१२.४ माहिती मिळवण्याची पद्धत 106
१२.५ पुरावे गोळा करणे आणि केस Build करणे 107
१२.६ योग्य वेळी आवाज उठवणे 108
१२.७ लोकांसमोर मुद्दा प्रभावीपणे मांडणे 109
१२.८ व्यवस्थेमधील विरोध हाताळणं 109
१२.९ एकट्याने नाही – लोकांना सोबत घ्या 110
१२.१० छोटा मुद्दा ⟶ मोठा प्रभाव 111
१२.११ "भ्रष्टाचाराविरुद्ध लढणारा" ही ओळख तयार करणं 111
१२.१२ तुमच्यामुळे व्यवस्था बदलते तेव्हा… 112

**प्रकरण १३. आंदोलनातून सुरुवात 113**
१३.१ आंदोलन म्हणजे नेमकं काय? 114
१३.२ आंदोलन का आवश्यक आहे? 114
१३.३ एकट्याचा आवाज vs जनतेचा आवाज 115
१३.४ आंदोलनाचे प्रकार 116
१३.५ लोकांना एकत्र कसं आणायचं? 116
१३.६ आंदोलनाचे नियोजन, कायदेशीर बाबी आणि सुरक्षा 117
१३.७ मीडिया कव्हरेज – आंदोलनाची ताकद वाढवणं 118
१३.८ आंदोलनात शिस्त आणि नियंत्रण 119

१३.९ दबाव तयार करणं 119
१३.१० आंदोलनातून नेतृत्व तयार होतं 120
१३.११ आंदोलन फेल का होतं? 120
१३.१२ आंदोलनानंतर काय? 121

**भाग ७. राजकीय ओळख आणि वाढ 123**

**प्रकरण १४. स्वत:ची राजकीय ओळख तयार करणे 125**
१४.१ राजकीय ओळख म्हणजे काय? 125
१४.२ तुमची वेगळी ओळख ठरवणं 126
१४.३ "तुम्ही कोणासाठी उभे आहात?" 126
१४.४ तुमची कथा तयार करणं 127
१४.५ सातत्यपूर्ण प्रतिमा निर्माण करणं 127
१४.६ विश्वासार्हता निर्माण करणं 128
१४.७ बोलण्याची पद्धत आणि संवाद कौशल्य 128
१४.८ शारीरिक हावभाव आणि वेशभूषा 129
१४.९ लोकांमध्ये सतत दिसत राहणं 130
१४.१० लोकांच्या मनातील चर्चा नियंत्रित करणं 130
१४.११ सकारात्मक आणि नकारात्मक प्रतिमा 131
१४.१२ अफवा आणि बदनामी हाताळणं 131
१४.१३ ओळख वाढवत नेणं 132

**प्रकरण १५. सोशल मीडियाचा योग्य वापर 134**
१५.१ सोशल मीडिया म्हणजे काय आणि का महत्त्वाचा? 134
१५.२ कोणत्या माध्यमांचा वापर करावा? 135
१५.३ काय आणि कसं मांडायचं? 136
१५.४ लोकांशी संवाद आणि प्रतिसाद 136
१५.५ ऑनलाईन ते ऑफलाईन जोडणं 137
१५.६ चुका टाळा – सोशल मीडिया वापरतांना 138

**प्रकरण १६. तंत्रज्ञान आणि भविष्याचं राजकारण 140**
१६.१ तंत्रज्ञानामुळे राजकारणात होत असलेला बदल 140
१६.२ माहिती आणि डेटा यांची ताकद 141
१६.३ AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा राजकारणात वापर 143
१६.४ डिजिटल ट्रेंड्स समजून घेणं 144

१६.५ AI द्वारे डिजिटल जाहिरात आणि प्रचार 145
१६.६ ऑनलाइन उपस्थिती 146
१६.७ खोटी माहिती आणि दिशाभूल यांचा परिणाम 146
१६.८ गोपनीयता आणि नैतिकतेचं महत्त्व 147

**भाग ८. निवडणूक प्रक्रिया आणि प्रचार रणनीती 148**

**प्रकरण १७. पक्ष आणि अपक्ष समजून घेणे 150**
१७.१ पक्ष आणि अपक्ष म्हणजे काय? 150
१७.२ अपक्षाचे फायदे आणि मर्यादा 151
१७.३ पक्ष निवड आणि प्रवेश 152
१७.४ पक्ष कसा काम करतो? 154
१७.५ पक्षातील स्थान कसं मिळवायचं 155
१७.६ कार्यकर्ता ते नेता – प्रवास 155
१७.७ पक्षातील अंतर्गत राजकारण 156
१७.८ तिकीट मिळवण्याची प्रक्रिया 157
१७.९ अपयश आणि निराशा हाताळणे 158
१७.१० स्वतःची स्वतंत्र ओळख जपणं 158

**प्रकरण १८. निवडणूक प्रक्रिया 160**
१८.१ निवडणूक प्रक्रिया म्हणजे काय? 160
१८.२ मतदार यादीचं महत्त्व 161
१८.३ आचारसंहिता आणि त्याचे महत्व 161
१८.४ उमेदवारी अर्ज भरणं 162
१८.५ नामांकन प्रक्रिया 163
१८.६ छाननी प्रक्रिया 164
१८.७ अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया 164
१८.८ निवडणूक चिन्ह मिळणं 165
१८.९ खर्चाचा हिशोब ठेवणं 165
१८.१० मतदान प्रक्रिया 165
१८.११ मतमोजणी प्रक्रिया 166
१८.१२ निवडणूक निकाल 167
१८.१३ निवडणुकीतील कायदेशीर बाबी आणि त्यांचं व्यवस्थापन 167

**प्रकरण १९. प्रचार आणि अंतिम रणनीती 169**

१९.१ प्रचाराचा खरा उद्देश 169
१९.२ प्रचारात सातत्य आणि शिस्त राखणं 170
१९.३ प्रचारात तुमचं वेगळेपण दाखवणं 170
१९.४ प्रत्येक भागानुसार दृष्टीकोन बदलणं 171
१९.५ विरोधकांशी तुलना आणि उत्तर 171
१९.६ प्रचारात वेळेचं महत्त्व 172
१९.७ कार्यकर्त्यांचा योग्य वापर 172
१९.८ प्रचारातील ५ मोठ्या चुका 173

**भाग ९. स्थानिक राजकारण आणि प्रत्यक्ष निवडणूक तयारी 174**

**प्रकरण २०. गावातील राजकारण आणि संधी 176**
२०.१ गावातील सत्तारचना आणि निर्णय प्रवाह 177
२०.२ गट-तट, जात आणि धर्म समीकरण 178
२०.३ प्रशासकीय भूमिका – ग्रामसेवक ते गटविकास अधिकारी 179
२०.४ निधी, योजना आणि पैसा प्रवाह 179
२०.५ गावातील समस्या आणि विकास का अडकतो? 180
२०.६ भ्रष्टाचाराची वास्तविकता आणि पॅटर्न 181
२०.७ तरुणांची उदासीनता आणि वापर 183
२०.८ विरोधकांची रणनीती आणि दबाव पद्धती 184
२०.९ आवाज उठवणाऱ्याला कसं थांबवलं जातं 185
२०.१० नवीन नेत्याची तयारी 186
२०.११ भीतीचं राजकारण तोडणं 187
२०.१२ गावासाठी नवीन विकास आराखडा तयार करणं 187
२०.१३ लोकांच्या सहभागातून विकास घडवणं 189
२०.१४ ग्रामसभेचं महत्व आणि ताकद 190
२०.१५ सरकारी योजना राबवून घेण्याची रणनीती 191
२०.१६ गावासाठी बाह्य संसाधनं कशी आणायची? 191
२०.१७ CSR फंड म्हणजे काय? आणि कसा मिळवायचा? 193
२०.१८ स्थानिक पाया → पुढचा प्रवास 195

**प्रकरण २१. मतदारांची मानसिकता ओळखणे 197**
२१.१ मतदार निर्णय कसा घेतो? 198
२१.२ पैसा, जात आणि भावना – निर्णयाचे ३ स्तंभ 198
२१.३ भ्रष्ट नेते वारंवार का जिंकतात? 199

२१.४ मतदारांचा Short Memory Effect 200
२१.५ शेवटच्या ४८ तासांचा गेम 201
२१.६ “Local Hero Effect” – स्थानिक नेता कसा तयार होतो? 202
२१.७ मतदारांना काय हवं असतं? 203
२१.८ मतदारांवर प्रभाव कसा निर्माण करायचा? 204

**प्रकरण २२. निवडणुकीपूर्व तयारी 205**
२२.१ निवडणूक म्हणजे नेमकं काय? 206
२२.२ तुमची पहिली निवडणूक 206
२२.३ मतदारसंघाचा सखोल अभ्यास 207
२२.४ मतदार यादी आणि मतदारांची विभागणी 208
२२.५ तुमची विचारधारा ठरवणं 208
२२.६ तुमचा आधार गट मजबूत करणं 209
२२.७ योग्य नियोजन आणि वेळ व्यवस्थापन 210
२२.८ साधनसामग्री आणि खर्चाचं नियोजन 210
२२.९ लोकांच्या भावना आणि अपेक्षा समजून घेणं 211
२२.१० नकारात्मकता आणि विरोधाला तयार राहणं 212
२२.११ निवडणूक जिंकणं किंवा हार म्हणजे शेवट नाही 212

**प्रकरण २३. प्रत्यक्ष निवडणूक व्यवस्थापन 214**
२३.१ निवडणूक जाहीर झाल्यानंतरची पहिली पावलं 214
२३.२ आरक्षण समजून घेणे 215
२३.३ उमेदवारी निश्चित करणं 216
२३.४ पॅनल आणि राजकारण 216
२३.५ स्पर्धकांचा अभ्यास 217
२३.६ बूथनिहाय नियोजन 218
२३.७ प्रचाराची गती आणि दिशा कायम ठेवणं 219
२३.८ सभा, बैठक आणि कार्यक्रमांचं नियोजन 220
२३.९ मतदानाच्या आदल्या दिवसाची तयारी 220
२३.१० मतदानाच्या दिवशीचं व्यवस्थापन 221
२३.११ मतदानानंतरची भूमिका 222

**भाग १०. राजकीय स्थैर्य, सत्ता आणि संघर्ष 223**

**प्रकरण २४. निवडणूक निकालानंतर काय? 225**